# महिला चळवळ आणि महिला संरक्षण विषयक कायदे

प्रा.डॉ.जयेश विक्रम पाडवी

पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग मुळजी जेठा स्वायत्त महाविद्यालय, जळगांव

…………………………………………………………………………………………………….

**प्रस्तावना :-**

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळातच सामाजिक सुधारण चळवळींचा जोर वाढलेला होता. या चळवळींच्या कृती आराखड्यांमध्ये महिलांच्या समस्यांशी संबंधीतच अनेक मुद्दयांचा समावेश होता. हे मुद्दे तत्कालिन वर्ण व्यवस्था व पुरुष सत्ताक व्यवस्थेतून मुक्ती मिळवण्याशी संबंधित होते. स्त्रियांना समाजामध्ये समान स्थान मिळावे यासाठी राजा राममोहन रॉय, महर्षी धोंडो केंशव कर्वे, फुले दांपत्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या नेतृत्वांनी पुढाकार घेवून अनिष्ट रुढी व परंवरावादी सामाजिक व्यवस्थेविरुध्द विविध मंचच्या माध्यमातून लढा उभारला. याचाच एक भाग म्हणुन भारत स्वातंत्र्यानंतर महिलांच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे बदल घडून आल्याचे दिसून येते. या कालाखंडात भारताने स्वातंत्र्य मिळविले आणि लोकशाही या राजकिय विचारणप्रणालीचा स्विकार केला. त्यामुळे लोकशाहीने प्रत्येक नागरिकाला मुलभुत अधिकार प्रदान केले एवढेच नव्हे तर या अधिकारांचे संरक्षण करणारा अधिकार देखिल मुलभूत अधिकारांतच प्राप्त झाला त्यामुळे भारतातील तत्कालीन समाजाच्या बुरसटलेल्या विचारधारांना लोकशाहीवादी विचारांचे प्रबळ आव्हान मिळाले. व्यक्ति स्वातंत्र्य व संघटन स्वातंत्र्यामुळे महिला संघटन वा गटांची संख्या सामाजिक, राजकिय व आर्थिक क्षेत्रात वाढत जाऊन समाजकारण व राजकारणावर प्रभाव टाकत आहे. मात्र ग्रामिण क्षेत्रात महिला संघटन प्रभाव पाडु शकले नाहीत तरी शहरी क्षेत्रातील स्त्री संघटन व काहीसे ग्रामीण स्त्रीयांसह महाराष्ट्रासारख्या राज्यात स्त्रियांचे सामाजिक सन्मानाचे स्थान मिळविण्यासाठी महिला चळवळीला चालना देत आहेत. याचाच प्रभाव म्हणून केंद्र व राज्य शासनानी मिळून महिला विकास व महिलांना संरक्षण पुरविण्यासंबंधी विविध धोरणे व उपाययोजना केलेल्या आढळुन येतात असे असले तरी महिलांचे काहीसे स्वातंत्र्यपूर्व काळातील सतीपद्धत, केशवपण, विधवा पुर्नविवाह आदी प्रश्न सुटले असले तरी हुंडाबळी, घरेलु हिंसा, बाल विवाह सारखे प्रश्नांनी नवीन रुप धारण केलेले आहेत. त्यामुळे हे प्रश्न कायद्याच्या चौकटीत आणून सोडविले आहेत. परंतु सामाजामध्ये हे प्रश्न अस्तित्वात आहेतच याकरिता महिला संघटन व व्यक्ति स्वातंत्र्यवादी संघटना याकरिता संघर्षरत आहेतच म्हणूनच अलिकडे महिला चळवळ ही सभा, संमेलन, परिषदा, परिसंवाद, चर्चासत्रे, इत्यादींच्यापुढे कळीचे मुद्दे ठरत आहे.

**शोध निबंधातील मुळ शब्द संज्ञा :-** महिला चळवळ (स्त्री मुक्ती चळवळ) सामाजिक सुधारणा, महिला संरक्षण विषयक कायदे, विकास धोरण इ.

**समस्या सुत्रण :-** प्राचीन काळात सुरुवातीलाच स्त्री-पुरष असा लिंगभेद केल्याचे आढळुन येत नाही. मात्र काही कालखंड जाऊन पितृसत्ताक पद्धतीने पुरुषाचे महत्व वाढविले. त्यामुळे स्त्रीचे स्थान कमी होऊन दुय्यम दर्जाचे ठरविण्यात पुरुष वर्ग यशस्वी ठरल्याचे आढळुन येते. साहजिकच पुढील काळामध्ये लिंग भेदामुळे न्यायासाठी किंवा समान दर्जा स्थान प्राप्तीसाठी संघर्ष अटळ होते. येथील सामाजिक रचना ही विषमतेच्या चौकटीत उभी केली गेली. यामुळे स्त्री घटकांवर वेगवेगळया अनिष्ट प्रथा – परंपरा लादुन एक प्रकारे त्यांच्या जीवन जगण्यावर प्रचंड दडपण निर्माण केले गेले. अत्याचार , छळ – पिळवणुक, शोषण वाढले. परिणामी या प्रतिगामी चौकटीतून बाहेर पडण्यासाठी हिरावून घेतलेला सन्मान परत मिळविण्यासाठी अनेक महिलांनी व स्त्रीवादाच्या समर्थकांनी साहित्य विचार, प्रत्यक्ष संघर्ष इ. च्या माध्यमातून लढा उभारला यासंबंधी अभ्यासचे विविध प्रवाह पुढे आलेले आहेत. यांचे अध्ययन करणे आवश्यक आहे म्हणून प्रस्तुत विषय अध्ययनासाठी निश्चित केला.

**उद्दिष्टे :- 1)** महिला चळवळीचा विकास समाजावून घेणे.

2) महिला चळवळींतील नेतृत्व व संघटनांचे कार्याचे स्वरुपाचे अध्ययन करणे.

3) महाराष्ट्रातील महिला चळवळ व राज्यशासन यांच्यामधील समन्वयाचा शोध घेणे.

**गृहितके :-**

1) समाजातील तत्कालीन अनिष्ट प्रथा, परंपरा, अन्याय – अत्याचार आणि समाजात महिलांना मिळणारे दुय्यम स्थान हेच महिला चळवळीच्या उदय व विकासाचे कारण आहे.

2) महिलांना सामाजिक विषमतेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी अनेक नेतृत्व व संघटनांनी संघर्ष केलेत.

3) महिला संघटनांच्या संघर्षमयी लढ्यामुळे राज्यशासन यांनी महिला विकास धोरण व संरक्षणविषयक कायदे केले.

**संशोधन पद्धती :-** प्रस्तुत शोध अभ्यासासाठी वर्णनात्मक अभ्यास पद्धतीचा आधार घेऊन माहिती संकलन करिता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात येवून त्या स्त्रोतांचे आकलन करुन निष्कर्ष नोंदवण्यात आले आहेत.

**अभ्यासाची मर्यादा :-** प्रस्तुत शोध अभ्यासात महिला चळवळीशी संबंधीत पाश्चात्य स्त्रीवादी विचार भारताच्या संदर्भात प्राचीन काळापासून सद्य काळापर्यंत विकासाच्या रुपरेषेचे अध्ययन करण्यात आले आहे तसेच महाराष्ट्रातील स्त्रीवादी व व्यक्तिस्वातंत्र्यवादी संघटन व नेतृत्वाचे माहितीयुक्त अध्ययन करुन राज्य शासनाची महिला विकास व संरक्षणविषयक भुमिकेचे थोडक्यात अध्ययन केलेले आहे.

**महिला चळवळ :-** महिला चळवळ मुलत: हक्क, अधिकार आणि दर्जा संबंधी आहे. यासाठी महिलांना प्रचंड संघर्ष करावे लागलेले आहेत. या संबंधी विद्युत भागवत "महाराष्ट्रातील स्त्रियांच्या आढावा" या लेखात महिला चळवळीला "स्त्रियांच्या चळवळी", "स्त्रियांच्या संघटना" असा उल्लेख करतात. यामध्ये स्त्रीवादी (Feminist) किंवा स्त्रीमुक्तीवादी (Womens Liberationists) असा उल्लेख करण्यास मुद्दाम टाळतात. त्यामुळे महिला चळवळ ही खरोखर स्त्रीयांच्या हक्कासाठी लढा देतात का? असा प्रश्न आवासुन उभा राहता. यासाठी पुढील विचारांचे महत्व लक्षात घेणे आवश्यक ठरते.

**1) पाश्चिमात्य महिलांचे स्त्रीवादी विचार :-** मानवाच्या उत्पत्तीपासून स्त्री हा लिंग घटक पुरुष किंवा घटकाचा गुलाम नव्हता असे अनेक अभ्यासकांच्या लिखाणातून स्पष्ट होते. सिमॉन द बोव्हा या फ्रेंच लेखिकेच्या The Decond Sex (1949) या पुस्तकात कोणी स्त्री म्हणून जन्माला येत नाही पण नंतर ती स्त्री बनविली जाते. म्हणजेच जन्माला आलेल्या बालकाला स्त्रीत्वाची किंवा पुरुषत्वाची कल्पना लादली जाते. असे नमुद केलेले आहेत. सिमॉन द बोव्हासह, व्हर्जिनिया बुल्क ( A room of ones own), हेलेन सिकसस (Icriture Feminine) , केट मिलेट (Sexual Politics) , मेरी बुल्टीन क्रोफ्ट ( A vindication of the Rights of women), ज्युलिया क्रिस्तेव (Women time), बेटी फ्रिडन (Feminine Mystique), जर्मेन ग्रिअर (The Female Eunch), शुलानिया फायरस्टोन (The dailactic of sex) इ. नी पाश्चात्य स्त्रीवादी विचार आपआपल्या लेखनात प्रभावीपणे मांडलेल्या आहेत. सदर स्त्रिवादी लेखिकांनी पुरुषसत्ताक दृष्टिकोनातून स्त्री घटकाला कसे दुय्यम दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. हेच त्यांच्या लिखाणातून स्पष्ट केलेले दिसून येते.

**2) भारतातील स्त्रीवादी विचार :-** भारताच्या प्राचीन काळात म्हणजेच पूर्व वैदिक काळात स्त्रीयांना मानाचे स्थान होते हे गार्गी, मैत्रेयी, कात्यायनी, सुलभा, लोपामुद्रा, अपाला, रोशमा, विश्ववरा, घोषा इ. स्त्री घटकांच्या भुमिकांवरुन स्पष्ट होते. मात्र उत्तर वैदिक काळात पितृसत्ताकाचे महत्व वाढविण्यात आले. त्यामुळे साहजिकच स्त्रीचे महत्व कमी झाले. स्मृतीकाळात बहुपत्नीत्वाची पद्धत रुढ झाली. त्यामुळे पुरुषांचे महत्व अधिक वाढले तर स्त्री चारित्र्यावर कठोर बंधने लादली गेली. यामध्ये उपनयनाचा अधिकार काढुन घेण्यात आला. शिक्षण बंदी, बालविवाहास प्रोत्साहन, विधवा पुर्नविवाह बंदी घालण्यात आली. जोडीदार निवडण्याचा स्वातंत्र्याचा अधिकार, घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्क असे अधिकार काढुन घेतल्याचे आढळुन येते. देवदासी आणि सती पद्धतीची प्रथादेखिल रुढ झाली. दरम्यान मुस्लिमांच्या आक्रमणामुळे भारतीय संस्कृतीवर मुस्लिम संस्कृतीतील महिलांची पडदा पद्धत लादली गेली.

मध्ययुगीन काळात मुस्लिम आक्रमणामुळे भारतीय स्त्रीयांचे जीवन अन्याय अत्याचारामुळे विस्कटुन घेले. असे असले तरी या काळात रझिया सुलतान, राणी पद्मीनी, संयोगिता, लुल्लादेवी, राणी कर्णावती, राणी चेत्रम्मा, चाँदबीबी, राणी भवानी, यांसारख्या कर्तबगार स्त्रिया होऊन गेल्या. तसेच साहित्य क्षेत्रात संत कवयत्री मीराबाई, महंमदबी, मुक्ताबाई, जनाबाई, होयम्मा, मधुरवाणी, वेंगमांबा, चद्रावती, आनंदमयी, गंगामणी, अशा किती तरी महत्वाकांक्षी स्त्रीया होऊन गेल्या. मोगल बादशाह सम्राट अकबरदेखिल सतीप्रथा, विधवांवरील निर्बंध, बालविवाह, यांसारख्या प्रथा मान्य नव्हत्या परंतु तत्कालीन भारतीय संस्कृतीवाद्यांना हे धोरण मान्य झाले नाही. त्यामुळे सर्वसामान्य स्त्रियांचे चुल आणि मुल एवढेच मर्यादित कार्यक्षेत्र राहिल्याचे आढळुन येते. परिणामी या काळातही पुरुषसत्ताक व्यवस्थेचे स्त्रियांचे आतोनात हाल केलेत असेच स्पष्ट होते.

उपरोक्त कालखंडांमधील स्त्री संबंधी प्रश्नांना उत्तर म्हणून 19 व्या शतकात भारतात महिला चळवळ सुरु झालेली आढळुन येते. हा काळ ब्रिटिश साम्राज्याचा असून दरम्यान भारतात सती पद्धत, स्त्रीयांचे केशवपण, विधवा पूर्नविवाह, ताठर जाती व्यवस्था, बालविवाह, बहुपत्नीत्व पद्धत इ. कुप्रथांमुळे येथील स्त्रियांचे जीवन हलाखीचे व दडपणवणुकीचे झाले हाते. या कु प्रथांनी स्त्रियांचे आनंदी जीवन हिरावुन घेतलेले होते. याची जाणिव भारतीयांना होऊन सामाजिक सुधारणा चळवळ

सुरु झाली. इ.स 1815 मध्ये राजा राममोहन रॉय यांनी आत्मीय सभेच्या माध्यमातून सती पद्धतीला विरोध केला. या व्यतिरिक्त शिऑसफिक सोसायटी, प्रार्थना समाज, आर्य समाज, ब्राह्मोसमाज यांनी महिला मंडळे स्थापन करुन स्त्री शिक्षणाला चालना दिली. महाराष्ट्रात इ.स 1848 मध्ये फुले दांपत्याने पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली. त्याचीच प्रेरणा घेउन इ.स 1849 मध्ये मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीदेखिल मुलींची शाळा सुरु केली. मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी सामाजिक जागृती केली. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. यासाह फुले दापंत्याने सामाजिक तिरस्कार सहन करुन सामाजिक सुधारणेचे कार्य सुरुच ठेवले. याच बरोबर पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो केशन, ताराबाई शिंदे, आनंदीबाई इत्यादींनीही अत्यंत महत्वपुर्ण भुमिका निभावली मुंबईमध्ये बद्रुद्दीन तय्यबजी आणि बेगम जंजिरा यांनी मुस्लिम मुलींकरीता शाळा सुरु केली. दरम्यान ब्राह्मण महिलाश्रम, महिला सेवा समाज, भगिणी समाज, चमनबाई प्रसुतीगृह आणि बालकल्याण मंडळ अशा संस्थाही स्थापन केल्या गेल्या. यावरुन या काळात अनेक सामाजिक सुधारणांसाठी विशेषत: स्त्रीसंबंधी सुधारणांत पुरुषांनीच मोठ्या प्रमाणात पुढाकार घेऊन संघर्ष केल्याचे आढळुन येते. दरम्यान ब्रिटीश साम्राज्यातून भारताला स्वतंत्र करण्यासाठी भारत स्वातंत्र्य चळवळ सूरू झाली. या चळवळीत अनेक महिलांनी स्वयंस्फुर्तीत सहभाग घेतला. परंतु राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवून येथील विषम सामाजिक व्यवस्थेमुळे हे स्वातंत्र्य स्थिर राहणार नाही. याची जाणिव होताच अखिल भारतीय स्त्री परिषदेने स्त्री – पुरुष यांना समान शिक्षण, वारसा हक्क, घटस्फोट, पतीच्या उत्पन्नातील वाटा इ. मागण्या केल्याचे आढळुन येते. याच बरोबर गोदावरी पुरुळेकर, उषाताई डांगे, ताराबाई मोडक, अनुताई वाघ, गंगुबाई पटवर्धन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, जयाबाई चौधरी, शांताबाई दाणी, अंजनाबाई, लक्ष्मीबाई नाईक, रघुनाथ कर्वे व मालती कर्वे, शकुंतला परांजपे इ. नी राष्ट्रीय चळवळीबरोबर सामाजिक सुधारणा चळवळीतही सहभाग घेऊन स्त्री शिक्षणासाठी आग्रही राहिल्याचे स्पष्ट होते.

3) **भारत स्वातंत्र्यानंतरची महिला चळवळ :-**15 ऑगष्ट 1947 रोजी भारत ब्रिटीश साम्राज्यातून स्वतंत्र झाला आणि 26 जानेवारी 1950 रोजी भारत प्रजासत्ताक देश म्हणून अस्तित्वात आला. प्रजासत्ताक दिनी भारताचे सर्वोत्कृष्ट संविधानही लागू झाले. या संविधानानुसार वर्ण व्यवस्था, लिंगभेद, वंशभेद इ. सर्व भेद नष्ट झाले. भारताच्या प्रत्येक व्यक्तिला मुलभूत अधिकार प्राप्त झाले. या मुलभूत अधिकारांचे संरक्षण करणार यंत्रणाही अस्तित्वात आली. त्यामुळे भेदभव करणाऱ्या बुरसटलेल्या सामाजिक व्यवस्थेला ही एक चपराक होती. पण तरीही सामाजिक व्यवस्थेतील बुरसटलेपणा अध्यापही खदखदतांना दिसून येतो. म्हणून सामाजिक न्यायाची योग्य अंमलबजावणी करण्याची मागणी अद्यापही महिला संघटना व व्यक्ति स्वातंत्र्यवादी करतांना दिसून येतात. भारतात साधारणत: 1960 ते 1975 च्या दरम्यान महिला संघटनांनी महागाई, बेकारी, गरीबी, भुमिहिनता, शहादा चळवळ तत्कालीन धुळे जिल्हा, पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण कमी, प्रसुती काळातील महिला व बालकांचे वाढते मुत्युचे प्रमाण, निरक्षतेचे प्रमाण, बलात्कार, लैगिंग छळ, हुंडाबळी, कौटुंबिक हिंसा, दृक-श्राव्य माध्यमांमधील अश्लिल भाष्य किंवा दृश्य, महिलांचा आरोग्याचा प्रश्न, समान काम समान वेतन, राजकिय प्रतिनिधीत्वाचा आरक्षणाचा प्रश्न या अशा प्रश्नांना घेऊन देशातील व राज्यातील विविध संघटना लढा देत आहेत. त्यानुसार केंद्रशासन व राज्यशासन यांच्या समन्वयातून महिला अधिकारांना संरक्षण व महिला सुरक्षांसंबंधी विविध कायदे करुन सकारात्मक अंमलबजावणी करण्यासाठी असंख्य स्त्रीवादी संघटना आग्रही आहे.

4) **महाराष्ट्रातील महिला चळवळ :-**महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीमुक्ती चळवळ सुरु झालेली आहे ते उपरोक्त मांडणीतून स्पष्ट होते. अलिकडे मुंबईसारख्या महानगरात अनेक महिला संघटना विविध विकास विषयक उद्दिष्टे घेऊन अस्तित्वात आलेल्या आहेत. या व्यतिरिक्त फोरम अगेन्स्ट ऑप्रेश्न, विमेन्स सेंटर, स्त्रीमुक्ती संघटना, मैत्रिणी, नारी समता मंच, क्रांतीकारी महिला संघटना, श्रमीक मुक्ती संघटना, मोलकरीण संघटना, फोरम अगेन्स्ट रेप, मनस्विनी, तलाक मुक्ती मोर्चा समिती इ. संघटना निषेध, मोर्चे, सभा, परिषदा, आंदोलन इ. साधनांचा वापर करुन संघर्षरत आहे. या संघटनांनी महिला विकासासाठी महिला चळवळीला नवी उभारी दिलेली आहे. त्यांनी सामुहिक किंवा स्वतंत्रपणे स्त्रियांचे प्रश्न व अन्याय विषयक प्रश्न सोडविण्याकरिता संघर्ष करत आहे. पतीकडून मारहाण, बलात्कार, हुंड्यांसबंधी दिला जाणारा त्रास किंवा भ्रुण हत्या, वेश्या व्यवसाय किंवा अलीकडील मंदिर-मस्जिद प्रवेश प्रश्न इ. प्रश्नांवर आवाज उठविला आहे. आर्थिकदृष्ट्या समान वेतन, पाळणाघराच्या विशेष सुविधा, बाळंतपणाच्या रजेची योग्य अंमलबजावणी किंवा मुदतवाढ इ प्रश्न हाताळलेले दिसून येते. आरोग्याच्या दृष्टिकोनातून स्त्रीयांना स्वत:च्या शरीराच्या रचनेचे व प्रक्रियेची जाणीव करुन देणे. त्यांना आरोग्य शिक्षण, स्त्रीयांवर औषधांचे होणारे दुष्परिणाम इ. प्रश्न लक्ष वेधलेले दिसून येते तर कायदा व घटनात्मक

हक्कांच्या दृष्टिकोनातून स्त्रियांना वारसा आणि संपत्तीचे हक्क, पोटगी, हुंडाविरोधी कायदा, सती, जुबानी तलाक, देवदासी इ. प्रश्नांविषयी जागृती केल्याचे दिसून येते.

5) **महाराष्ट्र राज्य महिला आयोग :-** महाराष्ट्र राज्य शासनाने एक संविधानिक संस्था म्हणून राज्य महिला आयोगाची 25 जानेवारी 1993 रोजी 1993 च्या महाराष्ट्र कायदा नं.15 नुसार स्थापन करण्यात आली. या आयोगाचे धोरणे पुढील प्रमाणे

1) बाल न्याय ( मुलांची काळजी व संरक्षण) नियम 2018
2) बाल धोरण, 2014
3) बाळ संजीवनी
4) महाराष्ट्राचे महिला धोरण
5) कार्पोरेट सामाजिक जबाबदारी
6) राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरण
7) राष्ट्रीय बाल धोरण
8) राष्ट्रीय पोषण धोरण
9) महाराष्ट्र राज्यात माझी कन्या भाग्यश्री योजनेची अंमल बजावणी करणे.
10) बलात्कार पिडीत, लैगिक शोषण पिडीत आणि हल्ला पिडीतांकरीता मनोधैर्य योजनेची अंमलबजावणी करणे
11) महाराष्ट्र राज्यात बेटी बचाव बेटी पढाओ योजनेची अंमल बजावणी करणे इ. धोरणांवर महाराष्ट्र राज्य महिला आयोगा काम करत असल्याचे दिसून येते.

या उपरोक्त धोरणांची अंमलबजावणी करण्याकरिता पुढील कार्यालयाची निर्मिती आयोगाने केलेली आहे.

राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य आणि पोषण मिशन, महाराष्ट राज्य महिला आयोग, केंद्रीय समाजकल्याण बोर्ड, महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, महिला व बाल विकास आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा आयुक्तालय या सर्व कार्यालयांच्या माध्यमांतून राज्य महिला आयोगाच्या योजना पुढील प्रमाणे राबविण्यात येत आहे.

1) बलात्कार पिडीत, लैगिक शोषण पिडीत बाल आणि हल्ला पिडीतांकरिता मनोधैर्य योजना,
2) माझी कन्या भाग्यश्री योजना
3) एकात्मिक बालविकास योजना (ICDS)
4) बेटी बचाव बेटी पढाओ योजना
5) बाल संगोपन संस्था (CCI)
6) महिला समुपदेशन केंद्र
7) अत्याचारग्रस्त पिडीत महिलांसाठी सावित्रीबाई फुले बहुउद्देशिय महिला केंद्र,
8) बाल सल्ला केंद्र
9) बाल संगोपन योजना
10) राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना
11) इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना
12) अनाथालय, महिला स्विकृती केंद्र आणि संरक्षित गृहे या मधील निराधार आणि परित्यक्त्या विधवांच्या मुलींच्या विवाहकरिता अनुदान
13) किशोरी शक्ति योजना
14) निराश्रित महिला, किशोरवयीन माता, अत्याचार पिडीत महिला यांच्यासाठी राज्य महिला गृहे (वय 18 ते 60 वर्षे )
15) देवदासी कल्याण् योजना
16) निराश्रित महिलांसाठी आधार गृहे
17) किशोरवयीन मुलींसाठी योजना
18) शुभ मंगल सामुहिक विवाह सोहळा

तसेच राज्य महिला आयोग व राज्य शासनाकडून विशेष संरक्षण दिलेले दिसुन येते ते पुढील प्रमाणे.

1956 – अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा,1956 – हिंदुविवाह व हिंदु वारसा कायदा,1961 – हुंडा प्रतिबंधक कायदा, 1961 – मातृत्व लाभ कायदा,1969 – भारतीय घटस्फोट कायदा,1976 – समान आर्थिक लाभ कायदा,1984 – कौटुंबिक न्यायालय कायदा,1990 – राष्ट्रीय महिला आयोग कायदा,1994 – लिंग निदान साधन (प्रतिबंध) कायदा,2000 – बाल न्याय कायदा,2005 – कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण कायदा, 2006 (1929) – बालविवाह प्रतिबंधक कायदा इ.

वरील कायद्यांनूसार महिलांना संरक्षण दिले गेले आहेत. हे कायदे व योजना महिलांचे उच्चाटन करण्यासाठी करण्यात आले आहेत. यामुळे महिलांचे शोषण, पिळवणुक, अन्याय, अत्याचार अनिष्ट प्रथा व चाली रितींना आळा बसेल या दृष्टिकोनातून शासनाने ही प्रतिबंधात्मक उपाय योजना केलेली आहे. याचबरोबर राजकिय क्षेत्रात सहभाग व प्रतिनिधित्वासाठी अनेक महिला संघटन व अभ्यासकांनी महिलांकरीता 33 टक्के आरक्षणाची मागणी केली होती. त्यामुळे स्थानिक शासन स्तरावर महाराष्ट्र राज्य शासनाने 50 टक्के आरक्षण लागु केले आहेत. त्यामुळे अलिकडे महिलांना निर्णय प्रक्रियेत यशस्वीपणे सहभाग घेण्याची संधी उपलब्ध झालेली आहे असे म्हणता येईल.

**निष्कर्ष :-** प्राचीन काळात सुरुवातीला महिलांना सन्मानाचे स्थान होते. परंतु उत्तर प्राचीन काळात स्त्रीयांचे महत्व कमी होऊन पुरुष वर्गाचे महत्व वाढले. त्यामुळे मध्यकाळात व आधुनिक पारतंत्र्याच्या काळातही स्त्री अत्याचाराचे प्रश्न सुटलेले नव्हते. हे प्रश्न सोडविण्यासाठी वेगवेगळे संघर्ष महिलांना करावे लागले. सामाजिक विषमतेची पाळेमुळे खोलवर रुजल्यामुळे प्रस्तुत काळातील काही कर्तबगार व महत्वाकांक्षी महिलांचे संघर्ष दुर्बळ ठरत होते. परिणामी पुढील काळात अनेक महिला संघटना अस्तित्वात आल्यामुळे व व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते विचारवंतांचे विचार प्रभावी ठरत असल्यामुळे स्त्रीमुक्तीसाठी सुरु असलेल्या लढ्याला काहीसे यशही मिळाले. अलीकडील लोकशाहीच्या पुरस्कर्त्या देशात स्वातंत्र्य , समता व न्याय या मुल्यांमुळे महिलांना पुरुषांसमान हक्क अधिकार मिळाले तसेच संविधानिक पातळीवर महिलांना संरक्षण दिले गेल्यामुळे महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये प्रभुत्व गाजवित आहे. तरी भ्रुणहत्या, हुंडाबळी, घरेलु हिंसा, बलात्कार यासारखे प्रश्न संपुष्टात आलेले नाही. मात्र काही महिला संघटना आता या प्रश्नांकडे डोळसपणे पाहतांना दिसत नाही. त्यांचे कामाचे स्वरुप काहीसे बदललेले दिसून येते तसेच राजकिय आरक्षण व प्रशासकिय सेवा क्षेत्रातील आरक्षणाचे प्रश्नही सुटलेले आहे परंतु पुरुष प्रधान संस्कृती अद्यापही राजकिय आरक्षणाचे पटलावर हस्तक्षेप करुन महिलांना दुबळे ठरवितांना दिसून येतात असे म्हणता येईल.

**संदर्भ :-**

1) भागवत विद्युत, लेख – महाराष्ट्रातील स्त्रियांच्या वळवळींचा आढावा, 1989 पा.नं.44
2) www.mscw.org.in
3) उपरोक्त
4) उपरोक्त
5) उपरोक्त
6) जाधव तुकाराम, सं.सुवर्ण महोत्सवी वर्ष – महाराष्ट्र वार्षिकी – 2010, युनिक ॲकेडमी पा.नं.787

**अन्य संदर्भ :-**

1) भारताचे संविधान, भारत सरकार, विधी, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय, (2006 मराठी आवृत्ती)
2) सें. सुशिला नायर, कमला माणकेकर (अनु.शांता कोठेकर) भारतीय प्रबोधनाच्या महिला प्रणेत्या, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया (2013)
3) मोहिनी कडू, भारतीय राजकारणातील स्त्रिया, विजय प्रकाशन 2000
4) प्रकाश पवार, समकालीन राजकिय चळवळी, डायमंड पब्लिकेशन -2011